ॐ

**॥ श्री गुरुदेव प्रसन्न ॥**

ता. ०५/०१/२०१५

परमार्थ निकेतन विश्वस्त मंडळ, बेळगांव व या संस्थेच्या सेवासमिती सभासदांची संयुक्त सभा दि. ०४ जानेवारी, २०१५ रोजी भक्तनिवास क्र. २ सभागृह, श्रीहरिमंदिर, बेळगांव येथे सकाळी ११.०० वाजता संपन्न झाली. सदर सभेतील ठळक नोंदीचा अहवाल खालीलप्रमाणे.

सभेच्या कामकाजाची सुरुवात सामुदायिक नामस्मरणाने करण्यात आली.

**विषय क्र. १ः** मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन व त्यास मंजुरी.
सेवा समिती सभासदांची मागील सभा दि. १२ जानेवारी, २०१४ रोजी संपन्न झाली होती. सदर सभेचे इतिवृत्त वाचून त्यावर योग्य तो विचार विनिमय झाला.
वरील सभेच्या इतिवृत्ताविषयी अन्य काही चर्चा नसल्याकारणाने हे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

**विषय क्र. २ः** दीपावळी २०१४ पासून जानेवारी २०१५ पर्यंतच्या कालावधीत, संपन्न झालेल्या प्रचार सप्ताहांविषयी चर्चा व विचार विनिमय. त्याप्रमाणे परमपूज्य आईंच्या पुण्यस्मरण उत्सवानंतर होणाऱ्या सप्ताहांविषयीचा कार्यक्रम, त्याविषयीचा सविस्तर अहवाल इथे पाठविला नसल्यास पाठवून देणेचे करावे.

मागील वर्षी घेतलेल्या उपक्रमामध्ये वयस्कर मंडळींकडून उपक्रमाला फार चांगला प्रतिसाद मिळाला. मंडळी वयस्कर असून सुध्दा तीन मजले चढून वर येत होती. सर्वांनी हा उपक्रम पण पाच दिवसांचा करावा असे मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या उपक्रमामध्ये पण फार चांगला प्रतिसाद मिळाला. परमपूज्य आईंच्या अशिर्वादाने मागील वर्षी घेण्यात आलेल्या सर्व उपक्रम गटाच्या कार्यक्रमास फार चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे यावर्षी गटाचे नियोजन करताना वाढीव अभ्यास ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

बेळगांव येथील उपक्रमाचा प्रतिसाद पाहून इतर केंद्रातील भक्त मंडळींना याचा लाभ मिळावा; असे बऱ्याच केंद्रांनी विनंती केल्यावरुन असे उपक्रम घेण्याचे नियोजन केले गेले.

मुंबई व ठाणे विभागामध्ये घेतलेल्या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळाला. उपक्रमाला येणाऱ्या मंडळींनी जेवणाचा डबा व पाण्याची बाटली आणल्यामुळे प्रसाद बनविण्यासाठी जो वेळ जायचा तो वाचला व सर्वांना अत्यल्प खर्चात उपक्रमाचा पूर्ण लाभ घेता आला. दुपारच्या जेवणानंतर लगेच सर्व मंडळी पंधरा ते वीस मिनीटामध्ये जागेवर येऊन बसलेली होती. आवराआवरी विशेष नसल्यामुळे सर्वांना उपक्रमाचा पुरेपूर लाभ घेता आला.

यंदा रत्नागिरी, देऊड(रत्नागिरी), मुलुंड, ठाणे, कल्याण, डोंबिवली, विरार, मिरज, सांगली, सातारा, महाड, रोहा, पेण व नाशिक विभागातील अनेक केंद्रामध्ये एक दिवसीय उपक्रम व कांही ठिकाणी नित्योपासनेचे कार्यक्रमपण घेण्यात आले. त्यामध्ये नित्योपासना शिकविणे व त्याचे चिंतन करण्यात आले. या सर्व विभागामध्ये घेतलेल्या उपक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला.

याबाबत रोहा, पुणे, मिरज, सांगली, ठाणे, राहाता, कोपरगांव, रत्नागिरी, जयसिंगपूर, नाशिक या केंद्रातील मंडळींनी उपक्रमाबाबत आपले मनोगत व्यक्त केले.

**विषय क्र. ३ः** मे २०१५ पेटी, तबला, भजन शिकणे व उपक्रम

यंदाच्या वर्षीही उपक्रमाचे गट करण्यात येणार आहेत. यामध्ये यावेळी वेगळे विषय घेतले जाणार आहेत. त्याचप्रमाणे नित्योपासनेचा पण कार्यक्रम घेण्याचे ठरविले आहे. भजन तबला व पेटी शिकणेकरिता नेहमी प्रमाणे नियोजन केले जाणार आहे.

**परगांवी भजन शिकविण्याच्या कार्यक्रमाविषयी सूचनाः**

नोव्हेंबर, २०१४ महिन्यामध्ये आठ दिवसाच्या कालावधित हनुमान जयंती या कार्यक्रमातील चाली शिकण्याकरिता, तसेच त्याला अनुसरुन पेटी व तबला वादन कसे करावयाचे याविषयीचे, मार्गदर्शन करण्याकरिता इथे बंधु-भगिनींना बोलाविण्यात आले होते. त्यामुळे सर्व मंडळी हरिप्रेमाने तृप्त होऊन हा आनंद घेऊन आपापल्या गावी रवाना झाली.

यंदा भजन शिकविण्याचा कार्यक्रम खालील उपासना केंद्रामध्ये राबविण्याचे ठरविले आहे. केंद्राचे नांव, भजन शिकविणाऱ्यांची नांवे व पत्रव्यवहाराचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

१) **कोल्हापूर** - कोल्हापूर परिसर (सौ. श्रद्धा सोवनी)

परमार्थ निकेतन, टी. पी. स्कीम नं. २/२१७, दुधाळी, रंकाळा बस स्थानकाजवळ, शिवाजी पेठ, कोल्हापूर - ४१६००२. फोन क्र. ०२३१-२५४६८७८ (श्री व्हरकट).

२) **मिरज, जत** व त्या परिसरातील शाखा (श्री. अभिजीत व्हरंगे)

परमार्थ निकेतन, मालगांव रोड, मिरज - ४१६४१०. फोन क्र. ०२३३-२२२८५०६.

३) **सांगली** व सांगली परिसरातील शाखा (श्री. संदिप रामचंद्र दोरुगडे)

परमार्थ निकेतन, ५६३/१, गांवभाग, हरिपूर रोड, बस स्टँडच्या मागे सांगली.

४) **पुणे** - पुणे व जवळपासच्या शाखा (श्री. संदीप गोखले, सौ. चित्रा रानडे)

परमार्थ निकेतन, १०००/४, नवी पेठ, पुणे - ४११०३०. फोन क्र. ०२०-३२९०८८१८.

५) **ठाणे** - ठाणे व परिसरातील शाखा व मुंबई पूर्व विभागातील शाखा (सौ. संगीता गोऱ्हे)

परमार्थ निकेतन, प्लॉट क्र. ३४८, जनरल अरूणकुमार वैद्य मार्ग, पाचपाखाडी, ठाणे (पश्चिम) - ४००६०२. फोन क्र. ०२२-२५३६९२३१.

६) **मालाड** - मालाड, मुंबई पश्चिम विभाग डहाणू पर्यंतच्या शाखा (सौ. अल्पना सातघर)

परमार्थ निकेतन, विजयकर वाडी, सहकार अपार्टमेंटच्या मागे, एस. व्ही. रोड, मालाड (पश्चिम), मुंबई - ४०००६४. फोन क्र. ०२२-२८८१३८३८.

७) **नाशिक** - नाशिक व त्या परिसरातील शाखा (श्री. मोहन खेडलेकर)

परमार्थ निकेतन, आदर्श नगर, रामवाडी, पंचवटी, नाशिक-४२२००३. फोन क्र. ०२५३-२५१३४४३.

८) **खेर्डी** - खेर्डी व रत्नागिरी जिल्ह्यातील शाखा (श्रीमती शेंबेकरताई)

परमार्थ निकेतन, मेन रोड खेर्डी, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, पिन कोड - ४१५६०४. फोन क्र. ०२३५५-२५६२६३.

९) **महाड** - रायगड जिल्ह्यातील शाखा (नंतर कळविण्यात येईल)

परमार्थ निकेतन, मु.पो. ता. महाड, जि. रायगड - ४०२३०१. फोन क्र. ०२१४५-२२४०९९.

१०) **गोवा विभाग** (श्री. योगेश मोर)

परमार्थ निकेतन, मेरशी, पोस्ट सांताक्रूझ, तिसवाडी, गोवा. फोन क्र. ०८३२-२४४८४४४.

११) **रहिमतपूर विभाग** (श्री. प्रणय नार्वेकर)

परमार्थ निकेतन, रोकडेश्वर गल्ली, कलानगर, रहिमतपूर, ता. कोरेगांव, जि. सातारा - ४१५५११. फोन क्र. ०२१६३-२३०९५१.

१२) **विरार (पश्चिम)** (कु. लिना खेडेकर)

परमार्थ निकेतन, साईबाबानगर, विरार (पश्चिम). फोन क्र. ०२५०-२५०२७७५, २५०९०९०. (श्री भदाणे).

१३) **कराड-सातारा विभाग** (श्री. स्वरुप आहिरराव)

परमार्थ निकेतन, वारवाण टि. वी. सेंटरच्या शेजारी, अर्बन बँकच्या मागे, शीला नगर, कराड, जि. सातारा - ४१५११०. फोन क्र. ०२१६४-२२४२१५.

१४) **पेण परिसर** (सौ.वर्षा सहस्त्रबुध्दे)

परमार्थ निकेतन, कासार तळे, श्रीसाई मंदिर समोर, पेण, जि. रायगड. फोन क्र. ०९३७०१६३१७७. (श्री वसंत वनगे).

१५) **रोहा** (नंतर कळविण्यात येईल)

परमार्थ निकेतन, रोहा, जि. रायगड.

वरील केंद्रांमध्ये भजन शिकविण्याकरिता शाखेंच्या सोईनुसार उत्सवाच्या भजनांच्या चाली आपापल्या मुख्य विभागीय केंद्रात शिकविण्याचा कार्यक्रम घेण्यात येईल.

परमार्थ निकेतन ट्रस्ट, श्रीहरिमंदिर, बेळगांव - एप्रिल ते जून २०१५ उपक्रम तपशील सोबतच्या जोडपत्राप्रमाणे आहे.

**आयत्यावेळचे विषयः**

परमपूज्य आईंच्या उपासना केंद्रांची संख्या साधारणतः १००० पर्यंत आहे. यासर्व उपासना केंद्रामध्ये आपापल्या परीने व सोईनुसार उपासना घेतल्या जातात. ज्याठिकाणी उपासनेसाठी स्वतंत्र वास्तू नाही, अशा उपासना केंद्राच्या ठिकाणी वर्षातून एकदा बालोपासनेचा सप्ताह व एक वार्षिक सप्ताहाचे नियोजन केले जाते. ज्याठिकाणी स्वतंत्र वास्तू आहेत त्या ठिकाणी शक्यतो श्रीहरिमंदिरातील कार्यक्रमाप्रमाणे कार्यक्रम घेतले जातात. अलिकडे अनेक विभागातून व केंद्रांमधून एकच सांगणे होत असते की आता आमच्या शाखेत भजनाची उपस्थिती कमी झालेली आहे. सेवेकरी पण कमी झालेले आहेत. भजन, वाचन, पेटी, तबला, इत्यादिंची सेवा करणारी मंडळी पण कमी झालेली आहेत किंवा जवळपास नाहितच अशी परिस्थीती आहे. पूर्वी सेवेसाठी येणाऱ्यापैकी आता कोणीही येत नाही. उपासनेला आले तरी सेवा करण्याची अनेकांची इच्छा नसते. कित्येक विभागामध्ये व उपासना केंद्रामध्ये

भजन शिकणे हा विषयच हाताळला गेलेला नाही. ज्याला जसे जमेल तसे भजन म्हणणे होत असते. प्रत्येकानी भजन नीट शिकून सराव करुन शाखा सुरु करावी हे परमपूज्य आईंचे सांगणे आहे. तरी अनेक ठिकाणी हा भाग लक्षात घेतला गेला नाही. एक वार किंवा दोन वार उपासना चालणाऱ्या केंद्रामध्ये वार्षिक सप्ताहाचे कार्यक्रम घेतात. प्रत्येक केंद्रामध्ये वार्षिक सप्ताहामध्ये श्रीहरिप्रेमलहरी या पुस्तकातील एक कार्यक्रम घेण्याचे ठरविण्यात येऊन पत्रिका आधी छापून सप्ताह ठरविण्याचे घडते. व कार्यक्रम कोण कसा घेणार हे नंतर ठरविले जाते. त्या उत्सवाच्या भजनाच्या चाली बहुतेक मंडळींना माहित नसतात, शिकणे झालेले नसते. त्यामुळे सर्वांसोबत सराव हा भाग दूरच राहतो. भजन सुरुवात कोण करणार? आता कसे करावयाचे हा प्रश्न उद्‌भवल्यावर मग इतर केंद्रातून कोणाला तरी बोलावून आणावयाचे व सप्ताह पार पाडावयाचा. अनेक सेवेकरी मंडळी कोणत्याही ठिकाणी भजन शिकण्यासाठी जात नाहीत व शिकण्याची इच्छाही नसते. पण भजनाची सुरुवात करण्याची इच्छा मात्र दर्शवली जाते. मग मनाला येईल त्याप्रमाणे भजन सुरुवात करावयाचे. तबला, पेटी, वाचन पण त्याचप्रमाणे करावयाचे.

परमपूज्य आईंच्या सांगण्याप्रमाणे भजन, वाचन, वाद्ये वाजविणे झाले पहिजे हे जाणून न घेता, भजनांचा, तबला व पेटी याचा सराव न घेता एकदाचा वार्षिक सप्ताह उरकला जातो. वास्तविक परमपूज्य आईंच्या सांगण्याप्रमाणे उत्सव-सप्ताह म्हणजे आपल्यामध्ये उपासनेबाबत नेहमीपेक्षा जास्तीचा उत्साह निर्माण होणे आवश्यक आहे. पण त्याचवेळेला बाहेरुन कोणालाही सेवेसाठी बोलावून ही वेळ निभावून नेली जाते व वर्षभर नेहमीची सेवा करणारी स्थानिक मंडळी ऐन सप्ताहाच्या वेळी त्यांच्या मागे बसून सप्ताहाचा लाभ घेतात. वार्षिक सप्ताहाची तारीख व कार्यक्रम ठरल्यानंतर सप्ताहाला दहा दिवस बाकी असताना अनेक उपासना केंद्रामधून व विभागातून आपापल्या जवळच्या मुख्य केंद्रामध्ये किंवा श्रीहरिमंदिरमध्ये अशी विचारणा केली जाते की पुढच्या चार, आठ दिवसात सप्ताहामध्ये आम्ही अमूक कार्यक्रम घेणार आहोत. आम्हाला या कार्यक्रमाच्या चाली व्यवस्थित येत नाहीत. वाचन नीट येत नाही, तबला, पेटी नीट येत नाही किंवा थोड्या प्रमाणात येते. आम्ही आपणाकडे आजच्याआज आल्यास तातडीने भजन शिकविले जाईल का? चार, आठ दिवसात असे भजन शिकून नंतर सर्वांसोबत सराव होऊन जाईल असे अनेकांना वाटते, पण ते शक्य आहे का? ऐन सप्ताहाच्या आधी भजनसुरुवात करणारी व्यक्ती भजन शिकण्यासाठी येणार असेल व तिचीच परिस्थिती अशी असेल तर शाखेत सप्ताहास येणाऱ्या मंडळींची परिस्थिती काय असेल? याचा विचार करणे जरुरीचे आहे. काही वेळेस कोणत्याही केंद्रप्रमुखांशी संवाद न साधता परस्पर तेथील सेवेकऱ्यांना सेवेसाठी बोलावून नेले जाते.

अनेक मुख्य केंद्रामध्ये भजन शिकविण्याचे उपक्रम दरवर्षी घेतले जातात, त्याठिकाणी या मंडळींचा सहभाग नसतो व सहभाग घेण्यास वेळ मिळत नाही असे सांगणे असते. मात्र सप्ताहामध्ये सेवा घेण्यासाठी मात्र त्यांच्याकडे भरपूर वेळ असतो. अनेक विभागांमध्ये दोन, तीन चार दिंड्या करुन सप्ताह घेतले जातात. ज्या उपासना केंद्राचा सप्ताह असेल, तेथे दुसरीकडून दिंडी येऊन सप्ताहाचा कार्यक्रम घेतला जातो व इकडे सप्ताहाचा अहवाल पाठविताना आम्ही सप्ताह घेतला असे नमूद केलेले असते. जर एखादे उपासनाकेंद्र अनेक वर्षापासून उपासनेत कार्यरत आहे तर अशी सेवा करणारे सेवेकरी तेथे का तयार झालेले नाहीत? ही सर्व कसरत का करावी लागते?

मुख्य भजनाविषयीच सर्व अडचणी आहेत यासाठीच सर्व तजवीज करावी लागते. बाकी अनावश्यक बाबी ज्या परमपूज्य आईंनी करु नये, असे सांगितलेले आहे, त्या करण्यासाठी मात्र सेवेकरी भरपूर प्रमाणात दिसून येतात. त्यासाठी भरपूर वेळही सहज मिळतो. त्यामध्ये कधीही कमतरता भासत

नाही. प्रत्येक केंद्रानी भजनाकरिता दुसऱ्यावर अवलंबून न राहता स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. अनेक सेवेकरी भगिनी लग्न होऊन परगांवी गेल्या, बंधु नोकरी करिता बाहेर गावी गेले, जुनी अनुग्रह घेतलेली सेवेकरी मंडळी आता येत नाहीत. अशा गोष्टी होत राहणारच म्हणून नेहमी जी मंडळी स्थनिक पातळीवर राहणारी आहेत त्यांनी भजन शिकून तयार व्हावे लागेल. बाहेरुन दिंडी येऊन सप्ताह घेतला की त्याला सप्ताह म्हणावयाचा आणि स्थानिक मंडळींनी सप्ताह घेतला तर त्याला सप्ताह म्हणावयाचे नाही असा काहीजणांचा गैरसमज आहे. श्रीहरिमंदिरात परमपूज्य आईंनी दर सोमवारी रात्री नित्योपासनेच्या उपासनेमध्ये चौऱ्यांशी ओव्या घेऊन पुढील येणाऱ्या उत्सवाच्या भजनांच्या चालींची उजळणी होण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आखून ठेवलेला आहे. मुख्य ठिकाणीच जर इतके सर्व केले जाते तर इतर ठिकाणी वर्षातून किमान एकदा सर्वांना एकत्रित घेऊन असा प्रयत्न का केला जात नाही?

काही विभागातून प्रातःस्मरण, सायंस्मरण, नित्योपासना शिकविण्यासाठी आमच्याकडे कोणी येऊ शकेल का? अशी विचारणा केली जाते. अशा वेळेला जसे जमेल त्याप्रमाणे येथून तशी व्यवस्था केली जात असते. ज्या विभागातून किंवा केंद्रामधून दिंडीतर्फे कित्येक शाखेमध्ये अनेक वर्षापासून सप्ताह घेतले जातात, त्यांच्याकडून त्या त्या शाखेंच्या सर्वमंडळींना एकत्र करुन आजपर्यंत किमान एकदा तरी भजन शिकविण्यासाठी प्रयत्न झालेला आहे का? याचे उत्तर बहुतेक करुन नाही असे येईल. दिंडी सप्ताह घेण्यास वेळ आहे आणि वर्षाकाठी एक दिवस सुद्धा यासाठी प्रयत्न करता येत नाही. कारण ती मानसिकताच नाही किंवा कसे? याचे कारण शोधणे जरुरीचे झालेले आहे.

यानंतर सभेपुढील सर्व विषयांवर विचार विनिमय पूर्ण झाल्यामुळे शेवटी परमपूज्य आईंचे ध्वनीमुद्रित केलेले प्रवचन तसेच अभंगवाणी सर्वांना ऐकविण्यात आली. त्यानंतर सद्‌गुरुंचा त्रिवार जयजयकार करुन या सभेचे कामकाज समाप्त करण्यात आले.

॥ श्री सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

**- सूचना -**

गट क्र. १ ते १७ उपक्रमाच्या प्रत्येक गटामध्ये किचन सेवेकरिता ८० भगिनींची नांवे घेण्यात येणार असल्याने यासाठी येणाऱ्यांची नांवे पाठविताना आपल्या नांवापुढे किचन सेवेकरिता असा उल्लेख करावा. स्वयंपाकघरातील सेवा करण्यास तरूण मुलींनी येण्यास हरकत नाही परंतु सेवेकरिता साड्या घेऊन येणे आवश्यक आहे. पहाटे लवकर उठणे, नाष्टा व स्वयंपाकाची तयारी करणे, भाजी चिरणे, चपाती करणे वगैरेची सवय असणे, नाष्टा व जेवण झाल्यावर पेले वाट्या व ताटे विसळणे व धुवून स्वच्छ ठेवणे इत्यादी सर्व प्रकारच्या सेवेची कल्पना द्यावी. त्यावेळेस इथे सर्वसाधारण ६०० मंडळी असतात. इथे आल्यावर सेवा झेपली नाही तर ऐनवेळी दुसरी सेवा देणे शक्य नसते. म्हणून येथील सेवेविषयी व इतर पूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

| परमार्थ निकेतन ट्रस्ट, श्रीहरिमंदिर, बेळगांव - एप्रिल ते जून २०१५ उपक्रम तपशील | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| गट क्र | येण्याची तारीख | उपक्रमाची तारीख | | जाण्याची तारीख | वयोगट | उपक्रमाचा तपशील |
| | | पासून | पर्यंत | | | |
| १ | 23/03/2015 | 24/03/2015 | 26/03/2015 | 27/03/2015 | | नित्योपासना शिकविणे |
| २ | 29/03/2015 | 30/03/2015 | 31/03/2015 | 01/04/2015 | १८ ते ५५ | दोन दिवसाचा उपक्रम |
| ३ | 06/04/2015 | 07/04/2015 | 08/04/2015 | 09/04/2015 | ५५ वरील वयस्कर मंडळींकरिता | वय ५५ वर्षे वरील वयस्कर मंडळींकरिता दोन दिवसांचा उपक्रम |
| ४ | 10/04/2015 | 11/04/2015 | 12/04/2015 | 13/04/2015 | | |
| ५ | 14/04/2015 | 15/04/2015 | 16/04/2015 | 17/04/2015 | १८ ते ५५ | दोन दिवसाचा उपक्रम |
| ६ | 23/04/2015 | 24/04/2015 | 28/04/2015 | 29/04/2015 | १८ ते ५५ | पाच दिवसाचा उपक्रम |
| ७ | 30/04/2015 | 01/05/2015 | 02/05/2015 | 03/05/2015 | १८ ते ५५ | दोन दिवसाचा उपक्रम |
| ८ | 04/05/2015 | 05/05/2015 | 11/05/2015 | 12/05/2015 | | सायंस्मरण भजन शिकणे |
| ९ | 13/05/2015 | 14/05/2015 | 21/05/2015 | 22/05/2015 | | गुरुपौर्णिमा उत्सव भजन शिकविणे |
| १० | 23/05/2015 | 24/05/2015 | 25/05/2015 | 26/05/2015 | | इयत्ता ९वी ते १२वी च्या मुलामुलींकरिता उपक्रम |
| ११ | 27/05/2015 | 28/05/2015 | 30/05/2015 | 31/05/2015 | | नित्योपासना शिकविणे |
| १२ | 02/06/2015 | 03/06/2015 | 07/06/2015 | 08/06/2015 | १८ ते ५५ | पाच दिवसाचा उपक्रम |
| १३ | 09/06/2015 | 10/06/2015 | 14/06/2015 | 15/06/2015 | १८ ते ५५ | पाच दिवसाचा उपक्रम |
| १४ | 16/06/2015 | 17/06/2015 | 18/06/2015 | 19/06/2015 | १८ ते ५५ | दोन दिवसाचा उपक्रम |
| १५ | 20/06/2015 | 21/06/2015 | 22/06/2015 | 23/06/2015 | १८ ते ५५ | दोन दिवसाचा उपक्रम |
| १६ | 24/06/2015 | 25/06/2015 | 26/06/2015 | 27/06/2015 | १८ ते ५५ | दोन दिवसाचा उपक्रम |
| १७ | 28/06/2015 | 29/06/2015 | 30/06/2015 | 01/07/2015 | १८ ते ५५ | दोन दिवसाचा उपक्रम |
| १८ | 04/05/2015 | 05/05/2015 | 11/05/2015 | 12/05/2015 | | पेटी शिकणे पहिला गट |
| १९ | 23/05/2015 | 24/05/2015 | 30/05/2015 | 31/05/2015 | | पेटी शिकणे दुसरा गट |
| २० | 04/05/2015 | 05/05/2015 | 11/05/2015 | 12/05/2015 | | तबला शिकणे पहिला गट |
| २१ | 13/05/2015 | 14/05/2015 | 20/05/2015 | 21/05/2015 | | तबला शिकणे दुसरा गट |
| २२ | 23/05/2015 | 24/05/2015 | 30/05/2015 | 31/05/2015 | | तबला शिकणे तिसरा गट |

<table>
<tr><th colspan="4">१८ ते ५५ वर्षे वयोगटातील मंडळींकरिता उपक्रम गट क्र. २, ५, ६, ७, ११, १२, १३, १४, १५, १६, १७ व ५५ वर्षाच्या पुढील वयस्कर मंडळींकरिता उपक्रम गट क्र. ३ व ४</th></tr>
<tr><th>वेळ</th><th>पहिला दिवस</th><th>वेळ</th><th>दुसरा दिवस</th></tr>
<tr><td rowspan="9">१०.०० ते १२.३०<br>व<br>२.०० ते ४.३०</td><td>परमपूज्य आईंच्या ध्वनीमुद्रीत प्रवचनांच्या माध्यमातून खालील विषयांवर मार्गदर्शन</td><td rowspan="9">१०.०० ते १२.३०<br>व<br>२.०० ते ४.३०</td><td rowspan="9">परमपूज्य आईंच्या प्रकाशनांविषयी माहिती व मार्गदर्शन व शेवटी परमपूज्य आईंची ध्वनिमुद्रित अभंगवाणी</td></tr>
<tr><td>परमपूज्य आईंनी सांगितलेल्या सूचना</td></tr>
<tr><td>परमपूज्य आईंनी सांगितलेले नियम</td></tr>
<tr><td>जयजयकार</td></tr>
<tr><td>भजन</td></tr>
<tr><td>वाचन</td></tr>
<tr><td>गजर</td></tr>
<tr><td>विज्ञापना</td></tr>
<tr><td>अजपाजप</td></tr>
<tr><td colspan="2">रात्रो ८.३० ते १०.१५ परमपूज्य आईंचे सचित्र दर्शन</td><td colspan="2"></td></tr>
</table>

<table>
<tr><th colspan="4">शालेय व कॉलेज वयोगटातील उपक्रम गट क्र. १० :- इयत्ता ९ वी ते १२ वी</th></tr>
<tr><th>वेळ</th><th>पहिला दिवस</th><th>वेळ</th><th>दुसरा दिवस</th></tr>
<tr><td rowspan="7">१०.०० ते १२.३०<br>व<br>२.०० ते ४.३०</td><td>परमपूज्य आईंचे ध्वनीमुद्रीत मार्गदर्शन</td><td rowspan="7">१०.०० ते १२.३०<br>व<br>२.०० ते ४.३०</td><td>सामुदायिक बालोपासना</td></tr>
<tr><td>परमपूज्य आईंनी सांगितलेल्या सूचना</td><td>सामुदायिक नामस्मरण</td></tr>
<tr><td>लहान मुलांवरुन आईंचे नियम</td><td>प्रार्थनेविषयी माहिती</td></tr>
<tr><td>नामस्मरणाची माहिती</td><td>नेमाविषयी माहिती</td></tr>
<tr><td>वाचन व बालोपासनेचे प्रात्यक्षिक</td><td>रुढी व अंधश्रद्धा याविषयी</td></tr>
<tr><td>सेवेविषयी माहिती</td><td rowspan="2">परमपूज्य आईंनी म्हटलेली बालोपासना</td></tr>
<tr><td>दर्शनाविषयी परमपूज्य आईंचे सांगणे</td></tr>
<tr><td colspan="2">रात्रो ८.३० ते १०.१५ परमपूज्य आईंचे सचित्र दर्शन</td><td colspan="2"></td></tr>
</table>

<table>
<tr><th>१८ ते ५५ वर्षे वयोगटाकरिता पंचदिवसीय उपक्रम गट क्र. ६, १२, १३ या पांच दिवसात खालील विषयांबद्दल माहिती व मार्गदर्शन होईल</th></tr>
<tr><td>परमपूज्य आईंनी सांगितलेल्या सूचना, परमपूज्य आईंनी सांगितलेले नियम, जयजयकार, भजन, वाचन, गजर, नामस्मरण, अजपाजप, प्रकाशनांच्या अंतर्गत माहिती (श्रीकृष्णप्रताप व त्यातील निवडक पदे);<br>चौथ्या दिवशी रात्रौ ८.३० ते १०.१५ परमपूज्य आईंचे सचित्र दर्शन,<br>शेवटच्या दिवशी परमपूज्य आईंची अभंगवाणी.<br>वि. सूचना : (सोबत श्रीकृष्णप्रताप हे पुस्तक आणावे)</td></tr>
</table>

- सूचना -

१) तरुण मुलामुलींच्या उपक्रम गटामध्ये त्यांच्या बरोबर एखादी वडीलधारी व अनुभवी व्यक्ती पाठविण्यास हरकत नाही.

२) वयस्कर मंडळींच्या गटामध्ये तब्येतीने सशक्त असलेल्या मंडळींनीच येण्याचे करावे.

३) उपक्रमातील सर्व कार्यक्रम हे तिसऱ्या मजल्यावर आयोजीत केले असल्याकारणाने, ज्या मंडळीनां दररोज दोन ते तीन वेळा चढ उतार करण्यास जमण्यासारखे असेल अशा मंडळींनीच येण्याचे करावे.

४) बंधू वर्गाकरीता उतरण्याची सोय भक्तनिवास क्र. ५ येथे पहिल्या मजल्यावर असणार आहे. तसेच भगिनीवर्गाकरीता उतरण्याची सोय भक्तनिवास क्र. ३ मध्ये तळमजला, पहिला, दुसरा व तिसऱ्या मजल्यावर असणार आहे. तरी या निवासाच्या ठिकाणी ज्यांना चढ उतार करण्यास झेपण्यासारखे आहे अशा मंडळींनीच येण्याचे करावे.

५) संपूर्ण दिवसभरात सर्व प्रसादाच्यावेळी, उपक्रमाच्यावेळी तसेच त्रिकाल उपासनेच्यावेळी खाली चटई किंवा सतरंजीवर बसावे लागणार आहे. आलेल्या प्रत्येक बंधु-भगिनींच्या करीता खुर्ची किंवा स्टुलवर बसण्याची व्यवस्था इथे नसल्याकारणाने ज्या मंडळींना खाली बसण्याची पूर्ण सवय आहे अशा मंडळींनीच येण्याचे करावे.

६) प्रत्येकाने आपापल्या तब्येतीची काळजी स्वतः घ्यावयाची आहे, इथे आल्यावर जर का कांही आजारपण उद्भवले तर त्यासाठी निराळी यंत्रणा राबविता येणार नाही. जर तसा प्रश्न उपस्थित झालाच तर अशा व्यक्तीनी स्वतःहून आपली सोय बाहेर करुन घ्यावी लागेल किंवा परतीचा प्रवास करावा लागेल याची नोंद घ्यावी.

७) भोजनामध्ये ज्यांना कांही खास पथ्य पाळावयास सांगितले असेल अशा मंडळींकरीता इथे निराळ्याप्रकारे भोजन बनविता येणे शक्य नाही. करीता इथे जो प्रसाद तयार केला जाईल तो ग्रहण करण्यास ज्यांची हरकत नसेल अशा मंडळींनीच येण्याचे करावे.

८) जर आपली कांही दैनंदिन औषधे घेणे चालू असतील तर ती आपल्या सोबत घेऊन येण्याचे करावे.

९) आपल्या सोबत पुरेसे अंथरुण व पांघरुण घेऊन येण्याचे करावे.

**येथे येताना शक्यतो कोणीही मोबाईल आणू नये.**

सर्व गटामध्ये येणाऱ्यांची नांवे खालीलप्रमाणे कळविण्याचे करावे.

अ) येणाऱ्या मुला/मुलींचे अथवा बंधू/भगिनींचे संपूर्ण नांव,वय व शाखा.

ब) इथून कळविलेल्या गट क्रमांका पैकी कोणत्या गटात येणार, कोणत्या तारखेपासून ते कोणत्या तारखे पर्यंत येणार?

क) आपल्याशी ऐनवेळी संपर्क साधण्यासाठी आपला स्वतःचा किंवा के/० दुरध्वनी क्रमांक कळवावा.

ड) वरील उपक्रमाकरीता येतेवेळी प्रत्येकांनी आपल्या सोबत बालोपासना, नित्योपासना नेमाच्या भजनाचे पुस्तक व आपल्याला कांही टिपून घ्यावयाचे असल्यास एखादी वही व पेन इ. घेऊन येण्याचे करावे.

दिनांक २३/०३/२०१५ पासून ०१/०७/२०१५ पर्यंत येथे दर्शनाकरिता व उपासने करिता कोणाचीही सोय होऊ शकणार नाही. याची नोंद घ्यावी.

*परमार्थ निकेतन ट्रस्ट, बेळगांव*

**तबला प्रथम गट :** हा गट फक्त तबला वादन शिकण्याकरिता असल्याने, यापूर्वी येथून प्राथमिक शिक्षण घेऊन नेमाच्या भजनात किमान एक वार तरी तबलावादन सेवा करण्यास ज्यांनी सुरु केले आहे अशा मंडळींना पुढील मार्गदर्शनाकरिता राहील.

**तबला दुसरा गट :** ज्यांचे भजनात तबला वादन सेवा व्यवस्थितपणे सुरु आहे व ज्यांना त्या पुढील मार्गदर्शन हवे आहे अशा मंडळींकरिता राहील.

**तबला तिसरा गट :** ज्यांचे भजनात तबला वादन सेवा सफाईदारपणे चालू आहे व ज्यांना जास्तीचे काही मार्गदर्शन हवे आहे अशा मंडळींकरिता राहील.

**पेटी प्रथम गट :** यापूर्वी येथून प्राथमिक शिक्षण घेऊन नेमाच्या भजनात किमान एक वार तरी पेटीवादन सेवा करण्यास ज्यांनी सुरु केले आहे किंवा ज्यांचे भजनात पेटी वादन सेवा व्यवस्थितपणे सुरु आहे व पुढील मार्गदर्शन

**पेटी दुसरा गट :** ज्यांचे भजनात पेटी वादन सेवा सफाईदारपणे चालू आहे व ज्यांना जास्तीचे काही मार्गदर्शन हवे आहे अशा मंडळींकरिता राहील.

पेटी व तबला शिकण्याकरिता येणाऱ्या बंधु-भगिनींना पेटी किंवा तबला वादनाचे प्राथमिक शास्त्रीय ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे. पेटी शिकायला येणाऱ्या बंधु भगिनींना स्वरांची मूळ ओळख, त्याच्या सरगम इ. विषयी माहिती असणे जरुरीचे आहे. तसेच तबला शिकण्याकरिता येणाऱ्यांना तबल्याचे प्राथमिक बोल, वाद्यावर हाताची बोटे ठेवण्या विषयीची माहिती इ. असणे आवश्यक आहे. एकदम नव-शिके किंवा वादनाविषयी, भजनाविषयी काहीच माहिती नसलेल्या मंडळींना इथे पाठविल्यास त्यांना आपल्या गांवी परत पाठविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तबला व पेटी शिकण्यासाठी येणाऱ्या बंधु-भगिनींनी श्रीहरिमंदिर, बेळगांव येथे येण्यापूर्वी खालील प्रमाणे सूचना लक्षात घ्याव्यात.

१) पेटी किंवा तबला वादन शिकण्याकरिता येणाऱ्या बंधु-भगिनींनी आपापली वाद्ये सोबत आणणे आवश्यक आहे.
२) मागील वर्षी शिकण्यासाठी आलेल्या मंडळीनी सातत्याने दुसऱ्या वर्षीही शिकण्यासाठी यावे.
३) ज्याप्रमाणे गटाचे स्पष्टीकरण केले आहे त्याप्रमाणेच शिकण्यासाठी पाठविण्याचे करावे.

**मे २०१५ या महिन्यात श्रीहरिमंदिरात भजन शिकणेविषयी :**

मागील वर्षभरात श्रीहरिमंदिर, बेळगांव येथे किंवा परगांवच्या मुख्य उपासना केंद्रात भजन शिकण्याच्या कार्यक्रमांना हजर राहून ज्यांनी नेमाचे प्रातःस्मरण, सायंस्मरण, बालोपासना, नित्योपासना या दैनंदिन उपासनेच्या सर्व चाली अवगत करुन घेतल्या असतील अशा बंधु-भगिनींनाच वरील कालावधीत उत्सवाचे भजन शिकण्याकरिता इथे पाठविण्याचे करावे.